# प्रकरण तिसरे

## शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी वाङ्.मयाची वैशिष्टये व त्यांचे एक दलित कादंबरीकार म्हणून ठळक असे वेगळेपण

## प्रकरण तिसरे

## शंकर भाऊ साठे यांच्या कादंबरी वाङ्‌मयाची वैशिष्टये व त्यांचे एक दलित कादंबरीकार म्हणून ठळक असे वेगळेपण

भारतीय स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण होऊन आज भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णवर्षात आपण वावरत असूनही भारतासारख्या लोकशाही राज्यात अस्पृश्यता निवारणाच्या चळवळी होऊनही अस्पृश्यता अद्यापही संपुष्टात आलेली नाही असे खेदाने म्हणावे लागते. आजच्या वृत्तपत्रातून दलितांच्यावर होणाऱ्या अन्यायांचे प्रसंग वाचून अस्पृश्य समाजाला यातनांचे भोग अजूनही सुटलेले नाहीत. दलितांचे प्रश्न दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहेत. अस्पृश्य समाज जातीय विषमतेच्या विळख्यातून सोडविणे किती आवश्यक आहे याची कल्पना येते.

ग्रामीण साहित्य चळवळीनंतर उदयाला आलेली दलित साहित्य चळवळ लक्षात घेता साहित्यनिर्मितीचे स्वरूप किती व्यामिश्र असते याची कल्पना येते. प्रथम महाराष्ट्रात व नंतर भारताच्या सर्व प्रांतात उदयाला आलेल्या दलित साहित्याचा अभ्यास करण्याची प्रेरणा मला झाली व ज्या जातीत मी जन्माला आलो त्या माझ्या जातीतील अण्णा भाऊ साठे व शंकर भाऊ साठे या दलित साहित्यिकांच्या साहित्याने माझे लक्ष वेधून घेतले. भावी काळात दलित साहित्य सामाजिक जीवनाला विधायक वळण लावेल याचा मला विश्वास वाटतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे या दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत ही घटना अभूतपूर्व घटना आहे असे मला वाटते.

### ग्रामीण साहित्याचा विकास :-

ग्रामीण साहित्याचा विकास घडवून आणण्यात अनेक लेखकांनी हातभार लावलेला आहे. भारत हा खेडयांचा देश असून शेती हा या देशाचा प्रधान व्यवसाय आहे. विशेषत: महाराष्ट्र हा खेडया-पाडयांचा, दगड-धोंडयांचा, दऱ्या-खोऱ्यांचा असा प्रदेश आहे. महाराष्ट्राची 80% जनता

अजूनही खेडयात राहते. इ.स.1920 नंतर महाराष्ट्रावर महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव पडून याच काळात साम्यवाद व समाजवाद हा ही संपूर्ण भारतात पसरलेला आढळतो. या परिस्थितीचा परिणाम मराठी साहित्यलेखन निर्मितीवर झालेला आहे व हे स्वाभाविक आहे.

मागील प्रकरणात साहित्य आणि समाज यांचा निकटचा संबंध मी स्पष्ट केला आहे. आजच्या समाजाची जडण–घडण करण्याचे बहुमोल कार्य मराठी साहित्याने केले आहे. इ.स.1963 नंतर ग्रामीण साहित्याची लाट उसळली. ग्रामीण साहित्य बहरास आले व अनेक तोलामोलाचे लेखक उदयाला आहे. हे एकप्रकारे नवजागरणच म्हणावे लागेल. ग्रामीण साहित्यानंतर दलित साहित्याची लाट उसळली व दलित साहित्यिकांनी कथा, काव्य, नाटक, कादंबरी आणि आत्मकथने या वाङ्‌मयप्रकारांचे लेखन केले. या काळात निर्माण झालेले दलित साहित्य म्हणजे तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, राजकीय चळवळींचा परिपाकच म्हणावा लागेल. दलित साहित्यिकांनी आपली नियतकालिके, संस्था स्वतंत्र स्थापन केल्या व त्यामुळे दलित साहित्य चळवळीला वेग आला.

ग्रामीण व दलित साहित्य चळवळीच्या अगोदर साहित्यनिर्मितीची सूत्रे प्रामुख्याने मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाच्याच हाती होती. मध्यमवर्गीय समाजाची चित्रेच साहित्यात प्रकट झाली. उपेक्षित समाज, सामाजिकदृष्टया जसा उपेक्षित होता तसा तो साहित्यातही उपेक्षितच होता. स्वातंत्र्याच्या काळात स्वातंत्र्यानंतर लोकशाहिचे हक्क सर्वांना प्राप्त झाले. त्यामुळे ग्रामीण जीवनाकडे विशेषत: गांधीजींच्या प्रेरणेने ग्रामीण जीवनाकडे सर्वांचे लक्ष वळले. ग्रामीण समाज शिक्षणाकडे वळला, शासनाच्या प्रयत्नामुळे ग्रामीण समाज शिक्षण घेऊ लागला व जो ग्रामीण समाज आर्थिकदृष्टया दुर्बल होता. त्याला अज्ञान, दारिद्रय व कष्ट या व्यतिरिक्त जीवनच नव्हते. अक्षरांची ओळख नव्हती, खेडयातील पाटील, कुलकर्णी, देशमुख–वतनदार, बागायतदार शेतकरी या वर्गातील लोकांची सेवा करण्यात बारा बलुतेदार गुंतलेले होते. शिक्षणाने हा वर्ग शिकून सवरून नोकऱ्या करून जागृत झाला व या जागृत झालेल्या लोकांतूनच ग्रामीण लेखक ग्रामीण साहित्य लिहू लागले. ग्रामीण लेखकांची एक फळी तयार झाली. त्यामध्ये अग्रक्रमाने श्री.म.माटे यांचे नाव आहे. त्या बरोबरच ग.दि.माडगूळकर, द.मा.मिरासदार, रा.रं.बोराडे, व्यंकटेश माडगुळकर, शंकर

पाटील, प्रा.डॉ.आनंद यादव, प्रा.द.ता.भोसले या सर्व लेखकांनी ग्रामीण जीवन अनुभवले व जे अनुभवले तेच लिहिले.

1950 च्या आसपास शिक्षण घेतलेल्या पहिल्य पिढीने ग्रामीण लेखन केले. या ग्रामीण लेखकांची ही पिढी खेडयातील होती. पण त्यांची स्थिती ही बऱ्यापैकी होती व हे लेखक खेडयात प्रतिष्ठित म्हणून ओळखले जात होते. या नंतरच्या पिढीतील लोक अर्धपोटी, काबाडकष्ट करून पोट भरणारे असे ग्रामीण लेखक पुढे आले. त्यामध्ये शंकर पाटील, व्यंकटेश माडगुळकर, रा.रं.बोराडे यांची नावे घ्यावी लागतील.

पुढील काळात स्वातंत्र्यामुळे शासनाच्या अनेक सवलती प्राप्त झाल्या व हा श्रमजीवी वर्ग शिक्षण घेऊ लागला. बहुजन समाजात नवजागरण सुरू झाले. व्यक्तित्वाची जाणीव होऊ लागली व या वर्गात आशावाद निर्माण झाला आणि हा आशावाद ग्रामीण साहित्यात प्रकट होऊ लागला.

दुसऱ्या महायुध्दात इतकी मनुष्यहानी झाली की त्यामुळे माणुसकीवरचा विश्वास उडाला, भयानक दारिद्रय भेडसावू लागले. या बदलत्या जीवनाचे पडसाद साहित्यात उमटू लागले व त्यातून प्रादेशिकतेचे पडसाद साहित्यात प्रकट होऊ लागले. श्री.म.माटे यांनी उपेक्षितांच्या अंतःरंगावर प्रकाश टाकला तर व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कथातून दुःख, दैन्य, दारिद्रय यांची चित्रे रेखाटली व यामुळे ग्रामीण समाजाच्या दुःखाला वाचा फुटली. इ.स.1950 ते इ.स.1969 या दरम्यानच्या कालखंडात बहुसंख्य लेखक शहरवासी झाले व त्यांनी बालपणी अनुभवलेल्या ग्रामीण जीवनाच्या बळावर ग्रामीण साहित्यलेखन केले. त्यामुळे या ग्रामीण कालखंडातील साहित्य मर्यादीत अनुभवाच्या कक्षेतच घोटाळत राहिले.

पुढील काळातील लेखकांनी मागील ग्रामीण लेखकांचे अनुकरण केले व हळुहळु ग्रामीण साहित्यात या 20–25 वर्षात ग्रामीण साहित्य ठराविक साच्यातच लिहिले जाऊलागले. त्यामुळे केवळ पार्श्वभूमी म्हणून निसर्गवर्णन, अकारण तपशिल, अकारण व्यक्तिचित्रणे, ग्रामीण विनोद वगैरे आढळू लागले. ग्रामीण कथा उथळ बनल्या. या काळात निर्माण झालेले जे चांगले होते ते टिकले.

बाकीचे काळाच्या ओघात नष्ट झाले. हळूहळू ग्रामीण कथेत मनोविश्लेषण आले व निसर्ग वर्णनाच्या पार्श्वभूमीवर मानवी मनाचे दर्शन घडविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

पुढील काळातील लेखकांनी मागीलांचा मागोवा घेत ग्रामीण लेखनाची वाटचाल केली. त्यामध्ये प्रा.डॉ.आनंद यादव यांच्या कथा उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे चारूता सागर, प्रा. इंदुकुमार नलगे यांनीही ग्रामीण कथालेखन करून मानवीजीवन व निसर्गजीवन यांची एकरूपता प्रकट केली.

ग्रामीण साहित्याच्या विकासाच्या वाटचालीत दलित साहित्याच्या एका नव्या प्रवाहाचे स्वागत झाले. दलितांच्या वाड्‌.मयामध्ये ग्रामीण जीवन व निसर्ग जीवन यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले. कृषी जीवनाशी निगडीत असणाऱ्या दलितांच्या व्यवसायाला ग्रामीण जीवनात महत्वाचे स्थान आहे. पूर्वी शेतकरी आणि बारा बलुतेदार यांच्याशिवाय गावगाडा चालूच शकत नाही अशी परिस्थिती होती पण यंत्रयुगात बारा बलुतेदारांचे महत्व कमी झाले. बैलगाडया गेल्या आणि ट्रॅक्टर आले, मोटारगाडया आल्या, खेडयातील माणसांनी शहराकडे धाव घेतली. खेडयातले जीवन व समाजरचना बदलू लागली व या बदललेल्या परिस्थितीचा परिणाम व अन्याय खेडयातील दुर्बल घटकांवर झाला. या दुर्बल घटकांना संकटातून सोडविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित चळवळीची मुहूर्तमेढ रोवली व या प्रेरणेतूनच दलित साहित्याचा उगम झाला. आज दलित साहित्याचा प्रवाह गतिमान होत आहे, समृध्द होत आहे. क्रांतीची व बंडाची भाषा या साहित्यातून ऐकू येत आहे. उपेक्षितांच्या जीवनात परिवर्तन घडल्याचा आशावाद निर्माण झाला आहे. प्रचलित समाजव्यवस्थेविरूध्द बंड करण्याचे धाडस दलितांच्यामध्ये येत आहे. जाती-पोटजातीमुळे दलित समाजाची छकलेही होत आहेत. परंपरांना व परंपरावाद्यांना धुडकावून लावण्याची भाषा बोलणारे दलित जातीव्यवस्था मात्र संपुष्टात आणू शकत नाहीत आणि दलितही आपली जात सोडत नाहीत. अशाप्रकारे ग्रामीण समाजाची अवस्था हेलकावे घेत आहे व द्विधा होत आहे आणि यामुळे ग्रामीण भागात दलित आणि दलितेतर असा दुहेरी संघर्ष आजही आढळत आहे.

आजचा दलित समाज आपल्या तीव्र विद्रोही वृत्तीने साहित्यात नवी क्रांती घडवून आणित आहे. प्रचलीत समाजव्यवस्थेने ज्यांना उपेक्षित ठेवले, ज्यांचे शोषण केले त्या समाजव्यवस्थेला, त्या परंपरेला नाकारण्याच्या वृत्तीतून निर्माण झालेले दलित साहित्य विलक्षण स्फोटक बनत आहे आणि त्यामुळे वेदना, विद्रोह, नकार आणि उद्रेक हे दलित साहित्याचे ठळक असे वैशिष्टय ठरत आहे.

दलित साहित्याचा विकास :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने प्रभावित झालेल्या कवींनी प्रचंड प्रमाणात सुरूवातीला काव्य निर्मिती केली. जलसे केले व दलित समाजाला जागृत केले. या कवींनी एका अर्थी उपेक्षितांना हिंदु धर्माच्या बाहेर ओढून काढण्याचे महान कार्य केले. परंतु यामुळे दलित साहित्य एकसूरी झाले व त्यात तोचतोपणा आला.

दलित चळवळ वाढू लागली, दलित शिकू लागले ते नोकऱ्या करू लागले. या बदललेल्या परिस्थितीमुळे या दलितांतर्गत एक मध्यमवर्ग तयार झाला व तो पांढरपेशा वर्गात वावरू लागला आणि स्वतःच पांढरपेशा बनला. प्रत्यक्ष बाबासाहेब आंबेडकरांना या समाजाने ब्राह्मण होण्याचा आग्रह केला आणि दलितांनी तर आपल्या जन्मदात्या आई-बापांचाच त्याग केला व काही दलित लेखकांनी फडके- खांडेकर यांचे अनुकरण करून कथा लिहिल्या पण या लेखकांना मात्र वाचकवर्ग लाभला नाही.

यानंतरचा जो दलितवर्ग तयार झाला त्यात अण्णा भाऊ साठे अग्रस्थानी असल्याचे दिसून येते. दलितांना एक थोर आणि समर्थ असा प्रतिभासंपन्न लेखक मिळाला. त्यांनी मध्यमवर्गीय मराठा, श्रीमंत-शेतकरी जीवनाचे चित्रण करून साहित्यलेखन केले. व त्यांनी वर्गकलहाचे तत्वज्ञान मांडले आणि त्यातूनच खेडयातील जातीयवादाचा, स्पृश्य-अस्पृश्यतेचा असंतोष मात्र व्यक्त केला.

अण्णा भाऊ साठे लिहित असतानाच शंकरराव खरातांच्या लेखणीला प्रेरणा मिळाली आणि त्यांनी अस्पृश्यतेची विदारक दु:खे आपल्या पात्र-प्रसंग चित्रणातून चित्रण करून अस्पृश्यतांबद्दलची करूणा निर्माण केली.

याच सुमारास पांढरपेशा होऊनही पांढरपेशा होता आले नाही अशा तरूण कवींनी मराठी कवितेच्या प्रेरणेने कविता लिहिल्या व आपण अस्पृश्य जातीत जन्माला आल्याची दु:खे त्यांनी त्वेषाने मांडली. या तरूणांच्या कविता त्यांच्या मध्यमवर्गीय मनोवृत्तीतून प्रकट झालेल्या होत्या म्हणून ही कविता खरी होती तशीच ही कविता खोटीही होती. कारण या कवींच्या मनाची द्विधा अवस्था झालेली होती.

कथा, कविता, कादंबरी, नाटक या वाङ्‌मयप्रकाराद्वारे या कालात दलित साहित्य निर्माण झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना स्वत:चा हुंकार मिळवून दिला. शतकानुशतके शोषलेल्या मनाचे आक्रंदन हेच दलित कवितेचे उगमस्थान आहे.

तात्पर्य – दलित साहित्याचा जन्मच मुळी दु:खातून झालेला आहे. अनेक दलित कवी उदयाला आले. यामध्ये किसन फागूजी बनसोडे, घोंगडे, वामन कर्डक, नारायण सूर्वे, नामदेव ढसाळ, दया पवार, ज.वि.पवार, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, प्रल्हाद चेंदवणकर इत्यादी कवींनी आपल्या व्यथा, वेदना कवितेतून प्रखरपणे मांडल्या व सामाजिक विषमतेवर हल्ला चढविला.

श्री.म.माटे हे खऱ्या अर्थाने दलितांचे दु:ख साहित्यात प्रथम मांडणारे दलित साहित्याचे अग्रदूत होत. त्यांचा "माणूसकीचा गहिवर" हा कथासंग्रह म्हणजे खऱ्या अर्थाने त्यांच्या अंत:करणातील माणूसकीच्या गहिवराचाच आविष्कार म्हणावा लागेल.

उदा. बन्सीधर ! तू आता कोठे रे जाशील ?" ही त्यांची हृदय हेलावून सोडणारी कथा. त्यानंतर कथालेखनाचा ओघ पुढे चालूच राहिला. तो अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, दया पवार, योगीराज वाघमारे, वामन इंगळे, वामन होवाळ, माधव कोंडविलकर, भास्कर चंदनशिवे या सर्व दलित कथाकारांनी आपली दु:खे, आपली अवहेलना, आपला झालेला

अमानुष छळ, पिळवणूक इतकी उत्कट व तीव्र रीतीने मांडली की त्यामुळे दलितवर्ग अंत:र्मुख झाला.

दलित कविता व दलित कथांचे क्षेत्र जेवढे वेगवान तेवढेच व्यापक आणि विस्तारलेले आढळते. त्या दृष्टीने या दलित वाङ्मयाच्या विकासाच्या पार्श्वभूमीवर दलित कादंबरीचा विचार केला तर दलित कादंबरीचे क्षेत्र काहीसे दुर्लक्षित झाल्याचे आढळते. तथापी अण्णा भाऊ साठे, बाबुराव बाबुल, केशव मेश्राम, हि.मो.बनसोडे, शंकरराव खरात, शंकर भाऊ साठे इत्यादी दलित कादंबरीकारांनी कादंबरी क्षेत्र गाजविले. व आपल्या नव्या सामाजिक जाणिवा व्यक्त करून आपले वेगळेपण सिध्द केले. काही दलित लेखकांनी एकांकिका हा वाङ्मयप्रकार अतिशय चांगल्या रीतीने हाताळून दलितांची आपल्या अंत:करणातील दु:खे, प्रक्षोभ, संघर्ष हे रंगभूमीवर आणून दलितांच्या दु:खांना दृक व श्राव्य स्वरूप आणून दिले. या संदर्भात प्राचार्य म.भि.चिटणीस, भि.शि.शिंदे, योगिराज वाघमारे, प्रेमानंद गज्वी, श्रीरंग सुर्वे, डॉ.गंगाधर पानतावणे, प्रा.दत्ता भगत, शाम मनोहर, रामनाथ चव्हाण इत्यादींनी एकांकिका, नाटक हे वाङ्मयप्रकार रंगभूमीवर आणून दलित रंगभूमीचे प्रयोग लोकप्रिय आणि यशस्वी केले.

कथा, कविता, कादंबरी, एकांकिका, नाटक इ. वाङ्मयप्रकारातून या सर्व दलित साहित्यिकांनी दलितांच्या सत्यजीवनदर्शनाच्या पार्श्वभूमीवर वास्तवतेची उभारणी करून कल्पकतेची दुनिया उभारली व रसिक वाचकांना नव्या दलित वाङ्मयाची ओढ लावली. या सर्व वाङ्मय प्रकारांच्यातून त्यांचा संताप, चिड, उद्वेग, प्रक्षोभ, मनस्ताप, बंडखोरी, विद्रोहीवृत्ती, नवसमाजनिर्माण करणारी जिद्द, क्रांती ही दलितत्वाची भावना साहित्यातून प्रकट केली. या संदर्भात प्रा.गं.बा.सरदार[1] यांनी दलितांच्या नव्या प्रवाहाचे स्वागत करून दलित साहित्यिकांना अंत:र्मुख करणारा इशारा दिला आहे. प्रा.सरदार यांच्या मते दलित साहित्यिकांनी केवळ वेदना, विद्रोह, नकार आणि उद्रेक आणि यातून निर्माण होणारे संघर्ष व्यक्त करताना केवळ एवढेच वैशिष्टये ठेवू नयेत तर तत्वचिंतन, भाषाप्रभुत्व, तंत्रसाधन या गोष्टींचीही आपल्या वाङ्मय निर्मितीच्या वेळी दखल घ्यावी. इ.स.1970 च्या दरम्यान मराठीमध्ये कथा, कविता, कादंबरीच्या

रूपाने सृजनशील साहित्य वेगाने निर्माण झाले. या नव्या साहित्य निर्मितीत दलित कवितेचा यशाचा मोठा वाटा आहे. तसा अन्य वाड्.मयप्रकारात मात्र आढळत नाही. तथापी दलित साहित्यिकांची आपण अनुभवलेले प्रसंग, सोसलेले अविस्मरणीय क्षण, भेटलेली माणसे यांची वास्तव, अतीवास्तव चित्रणे करण्यासाठी आत्मकथन, आत्मचरित्रे, आत्मकथा, या आकृतीबंधाचाही वापर करून दलित साहित्याच्या प्रांतात नव्या आकृतीबंधाचा प्रवाह सुरू केला. आणि यामुळे दलित साहित्याने मराठी साहित्यात मोलाची भर घातलेली आहे असे म्हणावे लागते. एकंदरीत दलित वाड्.मयाच्या वाटचालीत आत्मकथन या वाड्.मय प्रकाराने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दया पवारांचे "बलुतं", माधव कोंडविलकरांचे "मुक्काम पोष्ट देवाचे गोटणे", लक्ष्मण माने यांचे "उपरा", प्र.ई.सोनकांबळे यांचे "आठवणींचे पक्षी", शंकरराव खरातांचे "तराळ अंतराळ", राम नगरकरांचे "रामनगरी", दादासो मोरे यांचे "गबाळ", पार्थ पोळके यांचे "आभरान", शरणकुमार लिंबाळे यांचे "अक्करमाशी", रूस्तुम अचलखांब यांचे "गावकी", उत्तम बंडु तुपे यांचे "काटयावरची पोटं", ड़ॉ.भिमराव गस्ती यांचे "आक्रोश" व "बेरड", प्रा.शशिकांत तासगांवकर यांचे "घराणं तमासगीराच", डॉ.किशोर शांताबाई काळे यांचे "कोल्हाटयाच पोर", वामन आवळे यांचे "उघडा", शंकर भाऊ साठे यांचे "माझा भाऊ अण्णा भाऊ", आर.के.त्रिभूवन यांचे "दे दान सूटे गिराण", विठ्ठल साठे यांचे "खपलं देवाच्या नावानं" इ. या सर्व आत्मकथनकारांनी आपली दु:खे तीच आपल्या समाजाची दु:खे आहेत हे आपल्या आत्मकथनातून दाखवून दिले आहे. त्यामुळे लेखकाचे स्वत:चे व तो ज्या जातीत जन्माला आला त्या दलित समाजाच्या जीवनाचे चित्र या आत्मकथनांतून प्रकट झालेले आहे.

<u>दलित कादंबरी : स्वरूप आणि विचार</u> :–

सुमारे दुसऱ्या महायुध्दानंतर माणूस माणुसकीला पारखा झाला. बेसुमार मनुष्यहानी झाली, माणुसकी जळून गेली. या बदललेल्या मानवी जीवनाचे भस्म झालेले जीवन दर्शन मराठी कादंबरीत प्रकट झाले. या काळात प्रारंभी विश्राम बेडकरांची "रणांगण" ही कादंबरी प्रकाशित झाली. याच वाटेने मराठी कादंबरी वाड्.मय लिहिले जाईल असे वाटू लागले. व्यक्तिनिष्ठ सुख–दु:खांचे चित्रण करण्यातच ती रंगून जाईल असे वाटत होते. परंतु दिशाहीन झालेल्या मानवी जीवनाला दिशा

शोधण्याचा प्रयत्न या काळातील कादंबरी या वाड्.मयप्रकाराने केला. या काळातील कादंबरीकारांनी इतिहासकाळातील व पुराणकाळातील आपले आदर्श शोधण्याचा प्रयत्न केला. "स्वातंत्र्यानंतर घडून आलेल्या बदलाची, विविध स्थित्यंतरे, वैज्ञानिक प्रगती, सामाजिक विषमता, आर्थिक दुरावस्था आणि धर्मविचार यांचे मराठी कादंबरीकाराला नीटसे आकलन झाले नाही. याची साक्ष स्वातंत्र्यप्राप्ती नंतरची मराठी कादंबरी देऊ शकेल.[2] हे भालचंद्र फडके यांचे विधान कादंबरी वाड्.मयाच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

दलित कविता, दलित कथा, दलित आत्मकथने जशी मन वेधून घेतात तशी दलित कादंबरी मात्र वाचकाला वेधून घेत नाही. हे दलित कादंबरीच्या बाबतचे कटू सत्य आहे. मात्र या संदर्भात बाबुराव बागूलांची "सूड", केशव मेश्रामांची "हकिगत व जटायू", अण्णा भाऊ साठे यांची "फकिरा" हे अपवाद म्हणावे लागतील. एकंदरीत दलित कादंबरीलेखन फडके–खांडेकरांच्या कादंबरी लेखनाचे आदर्श घेऊनच लिहिले गेलेले आढळते. दलित साहित्याचे प्रेरणास्थान व दलितांच्या मुक्तीसंग्रामाचे अग्रदूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न हरिभाऊ पगारे यांनी आपल्या "युगप्रवर्तक" (1970) या कादंबरीत केला आहे. परंतु श्री. पगारे यांना बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महापुरूषाच्या जीवनाचे, त्यांच्या दैदिप्यमान संघर्षशील व्यक्तिमत्वाचे, त्यांच्या अस्मितेचे दर्शन त्यांच्या कादंबरीतून चित्रित करण्याचे श्री. पगारे यांना जमलेले नाही असे त्यांची "युगप्रवर्तक" ही कादंबरी वाचताना वाटते. सर्व दृष्टीने ही कादंबरी अपुरी वाटते हेच खरे होय.

श्री. हिं. गो. बनसोडे यांनी "दलितांचा मुक्तीलढा" ही कादंबरी देखील डॉ. बाबासाहेब आंबडेकरांसारख्या महापुरूषाच्या मुक्ती संग्रामावर लिहिली आहे. ही कादंबरी विषय, आशयाच्या आविष्काराबरोबर अभिव्यक्तीच्या दृष्टीने अपूरीच आहे.

दलित कादंबरी समृध्द करणारे प्रमुख लेखक म्हणजे अण्णा भाऊ साठे आणि शंकरराव खरात असा निर्वाळा भालचंद्र फडके[3] यांनी व इतर अभ्यासकांनीही दिलेला आहे तो अगदी योग्य आहे. याच संदर्भात अण्णा भाऊ साठे यांच्या पंक्तीला शंकर भाऊ साठे यांचे नाव घेणे योग्य

ठरते असे मला वाटते. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या काही कांदबऱ्यांतून दलित माणसांच्या व्यथा, वेदनांना बोलके केले आहे.

उदा. "फकिरा" ही त्यांची कादंबरी प्रत्यक्ष घडलेल्या सत्यघटनेवरच लिहिलेली आहे. त्याचप्रमाणे शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा", "घमांडी" व इतर सर्वच कादंबऱ्या ह्या वास्तव घटनेवर आधारीत अशा लिहिलेल्या आहेत हेच खरे. या संदर्भात अण्णा भाऊ साठे आपल्या फकिरा कादंबरीच्या (प्रस्तावनेत) "कैफियत" मध्ये लिहितात[4], "मी लिहिताना सदैव सहानुभूतीनं लिहिण्याचा प्रयत्न करतो. कारण ज्यांच्या विषयी मी लिहितो ती माझी माणसे असतात. त्यांची मुर्वत ठेवूनच मला लिहिणे भाग पडते. हा "फकिरा" ही माझा होता. जे साकार नाही त्याला आकार देण्याचं सामर्थ्य माझ्या ठायी नाही. जे पाहिलं, अनुभवलं, ऐकलं तेच लिहिलं आहे."

अण्णा भाऊ साठे यांच्या म्हणण्याप्रमाणेच शंकर भाऊ साठे हे सुध्दा आपल्या कादंबरी लेखनाच्या वास्तवतेबाबत आपल्या "सूड" या कादंबरीच्या प्रास्ताविकामध्ये म्हणतात[5] – "मी या कादंबरीमध्ये कल्पनेने काही लिहिले नाही. हे सर्व काही सत्यच घडले आहे. ही माणस मी प्रत्यक्ष पाहिलेली आहेत. निव्वळ कल्पनेने लिहायचे झाले, तर ते मला जमत नाही. त्यामध्ये काही तरी सत्य असलेच पाहिजे. तरच मी लिहित असतो." शंकर भाऊ साठे आपल्या लेखन साहित्याबद्दलची प्रेरणा आणि उद्देश अधिक स्पष्ट करताना "लखू" या कादंबरीच्या "थोडक्यात दोन शब्द" (प्रास्ताविकात) म्हणतात[6] की – "ही धाडसी झुंजार माणसं अंधारात राहू नयेत म्हणून अण्णा भाऊंनी "राणोजी", "फकिरा", "सावळा" ही अन्यायाविरूध्द बंड करणारी मातंग समाजाची माणसं महाराष्ट्राला दाखवून दिली. "एकच काडतूस" चा "दौलती", घमेंडखोर "घमांडी" ही सुध्दा याच समाजाची होती. यांना अंधारातून उजेडात आणायचे काम आम्ही केले आहे. कारण ही माणसं आमची होती. ती सत्यासाठी लढणारी होती, अन्याय त्यांना सहन होत नव्हता म्हणून ती माणसं कादंबरीरूपानं वाचक वर्गापर्यंत पोहचावीत म्हणून मी हा "लखू" लिहिला आहे." शंकर भाऊ साठे यांचे हे उद्गार अण्णा भाऊ साठे यांच्या उद्गारांशी कितीतरी एकजीव झालेले आहेत याचा प्रत्यय शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या वाचताना पदोपदी येत राहतो. म्हणूनच दलित साहित्यातील

अण्णा भाऊ साठे व शंकरराव खरात या प्रमुख दलित कादंबरीकारांच्या पंक्तीला शंकर भाऊ साठे यांना बसण्याचा मान आपोआपच मिळतो असे मला वाटते.

अण्णा भाऊ साठे यांच्या प्रमाणेच शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील सर्वच्या सर्व घटना प्रसंग आणि नायक, नायिका ह्या सत्य असतात. दलित कादंबरीकार शंकर भाऊ साठे यांनी आपल्या कादंबऱ्यातून चित्रित केलेल्या नायक, नायिका शंकर भाऊ साठे यांनी प्रत्यक्षपणे पाहिलेल्या आहेत. या कादंबऱ्यातील नायक–नायिकांशी शंकर भाऊंचा प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे संबंध आलेला आहे. याचा प्रत्यय शंकर भाऊंच्या "सगुणा" या कादंबरीच्या "थोडक्यात दोन शब्द" या (प्रस्तावनेत) शंकर भाऊ म्हणतात की – "माझ्या नि अण्णा भाऊंच्या कादंबऱ्यांचा जन्म आमच्याच परिसरात होऊन गेला आहे." याप्रमाणेच "सूड" मध्ये ते म्हणतात – इ.स.50–51 साली जी चळवळ उभारली, त्यावेळी मी शिराळा तालुक्यातील तांदुळवाडी पासून थेट पेठलोंडपर्यंत सारा वारणा खोऱ्यात पायी प्रवास करून, त्यांना अनेक शाहीरी कार्यक्रम दिले आहेत. ही माणसं काहीतरीच नव्हती, की ज्यांनी इंग्रजांसारख्या मातब्बर सरकारला हलवून सोडले होते. ती माणसं माझी होती. त्याचवेळी क्रांतीसिंह नाना पाटील हे सुध्दा आमच्या बरोबरच पायी प्रवास करीत होते. तसेच "चंद्रा" ही फारच प्रेमळ होती अन् तितकीच धाडसीही होती. तिने जेव्हा या चळवळीसाठी आपले घर सोडले, तेव्हा ती चार–पाच वेळा मला भेटली होती." वरील विवेचनाचा स्पष्ट अर्थ असा की शंकर भाऊंच्या कादंबऱ्यातील नायक–नायिकां ह्या शंकर भाऊंनी समक्ष पाहिलेल्या होत्या व कादंबऱ्यातील घटना–प्रसंग हे सत्य होते याची खात्री पटते. शंकर भाऊ साठे यांना भेटलेली, वारणा खोऱ्यातील जबर माणसेच शंकर भाऊंनी आपल्या कादंबऱ्यांचे नायक–नायिका बनविले. शंकर भाऊ साठेंनी हे नायक–नायिका कादंबरी रूपाने वास्तव स्वरूपात आणले. या संदर्भातही मला शंकर भाऊंच्यामध्ये अण्णा भाऊंच्या पात्रांचेच साम्य आढळते म्हणून मी शंकर भाऊ साठे यांना अण्णा भाऊंच्या पंक्तीला बसविण्यात धन्यता मानतो. फरक इतकाच की अण्णा भाऊंना अफाट लोकप्रियता मिळाली आणि शंकरभाऊंना त्यांच्या दुर्दैवाने यत्किंचितही लोकप्रियता लाभली नाही. माझ्या या लघु शोध निबंधाच्या अभ्यासामुळे शंकर भाऊंचे कादंबरी वाङ्मय वाचक वर्गापर्यंत पोहचून लोकप्रियतेचा

१ दर्जा प्रापत करू शकेल असे मला वाटते. "फकिरा", "आवडी", "वैर", "चिखलातील कमळ", "माकडीचा माळ", "वारणेचा वाघ", "संघर्ष", "जिवंत काडतूस", "अलगूज" या सारख्या इतर अशा म्हणून पस्तीसएक (35) कादंबऱ्यांचा अफाट संसार थाटून अण्णा भाऊ साठे यांनी अफार लोकप्रियता मिळवली तर अण्णा भाऊंच्या शंकर भाऊ या धाकटया बंधूनी "सावळा", "धनांडी", "लखू", "बाजी", "हंबीरा", "बायडी", "सगुणा", "सुगंधा", "एकच काडतूस", "सूड", "जग", "काळा ओढा" या सारख्या सुमारे बारा कांदबऱ्या लिहून अण्णा भाऊंचाच कादंबरी लिखाणाचा वारसा पुढे चालविला.

भाऊ पाध्ये यांची "वासूनाना", जयवंत दळवी यांनी "चक्र", आणि मधुमंगेश कर्णिक यांची "माहिमची खाडी" ह्या दलितेतरांनी दलितांवर लिहिलेल्या कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. या मराठी कांदबऱ्यातून झोपडपट्टीतील पशुपातळीवरील जीवन चित्रित केले गेले आहे. या कादंबरीत उभे केलेले अन्नक्षुब्धेचे व कामक्षुब्धेचे उग्रविश्व पाहताना पांढरपेशा मध्यमवर्गीय वाचकांचे डोळे चक्रावून गेले. या सर्व लेखक्रांना झोपडपट्टीतील भयानक वास्तवतेचे मूळ सामाजिक व आर्थिक विषमतेत आहे हे प्रभावीपणे मांडता आलेले नाही. शंकरराव खरात यांनी "हातभट्टी" या कादंबरीत झोपडपट्टीतले प्रत्ययकारी चित्रण केले असले तरी ते केवळ वर्णन पातळीवरच झाले आहे. त्यातील भीषण वास्तवाचा वेध त्यांना देखील प्रत्ययकारी करता आलेला नाही. "मी मुक्त । मी मुक्त ।।" कादंबरीत शंकरराव खरातांनी अनाथाश्रमात वाढलेल्या एका मूलाची कथा सांगितलेली आहे. अनाथ म्हणून वाढलेल्या मुलाच्या जीवनातील नाट्य रंगविण्यात खरांताना देखील फारसे यश आलेले नाही. गावचा टिनोपाल गुरूजी या खरातांच्या कादंबरीला सत्यघटनेचा आधार आहे. या कादंबरीत खरातांनी शिक्षण क्षेत्रातील बजबजपूरीचे व भ्रष्टाचाराचे वास्तवचित्र रेखाटले आहे. तसेच "सिध्देश्वर" सारख्या व्रतस्थ, निर्भय शिक्षकाचे चित्रही रेखाटले आहे. ते प्रत्ययकारी झाले आहे. खरातांच्या कथालेखनामागे जी सामाजिक जाणिव आहे तशी जाणिव त्यांच्या कादंबरी लेखनात मात्र आढळत नाही.

प्रा.केशव मेश्राम यांची "हकिगत व जटायू" ही कादंबरी "मराठी कादंबरीला महत्वाची देणगी आहे" असा शांता शेळके यांनी या कादंबरीला दिलेला अभिप्राय येथे मेश्राम यांच्या ठिकाणी असणाऱ्या कलावंताच्या दृष्टीचो जाणिव करून देतो. कारण या कादंबरीत दुर्बलांसाठी स्वतः रक्तबंबाळ होणारा 'जटायू' हे मिथ योजले आहे व ही प्रतिकात्मक कादंबरी लिहिली आहे.

"सावली" व "डोंगरमाथ्यावरील दिवा" या दोन कथा संग्रहातून श्री.ना.रा.शेंडे यांनी कथालेखक म्हणून नाव मिळविले व त्यांनी कादंबरी क्षेत्रातही पाऊल टाकून आपले कादंबरी लेखक म्हणून वेगळेपण सिध्द केले. "काजळी रात्र" (1956), "तांबडा दगड" (1958), "विलासिनी" (1974), "अन्शुजा" (1974) या त्यांच्या चार कादंबऱ्या आत्मकथनात्मक आहेत. भारतीय स्त्री किती उच्च व उदात्त असू शकते हे श्री.ना.रा.शेंडे यांनी आपल्या कादंबऱ्यातून दाखवून दिले आहे.

उदा. – "विलासिनी' व "अन्शुजा" या कांदबऱ्या.

श्री.ना.भ.जाधव यांनी लिहिलेली "अंजना" ही फडके प्रणित प्रेमकथा असलेली कादंबरी होय. दलित–ब्राह्मण असा मिश्रविवाह हा या कादंबरीचा विषय आहे.

तात्पर्य – अण्णा भाऊ साठे, शंकरराव खरात आणि केशव मेश्राम हे तीन अपवाद दलित कादंबरी वाङ्.मयातून वगळता दलित कादंबरी बेताचीच वाटते. अण्णा भाऊ, शंकरराव खरात आणि केशव केश्राम यांच्याबरोबरच माझ्यामते शंकर भाऊ साठे यांचे नाव जोडून हे दलित कादंबरी क्षेत्रातील चार अपवाद वगळता कादंबरी लेखन करणाऱ्या दलित कादंबरीकारांच्या लिखाणाची झेप अनुकरणाच्या पलिकडे जात नाही असे वाटल्यावाचून राहत नाही. स्वतंत्र कादंबरी रचना या दृष्टीने शंकर भाऊ साठे यांचे कादंबरी लेखन वाङ्.मयीनदृष्टया आशय, विषय, अभिव्यक्तीच्या अनुषंगाने रसास्वाद घेण्यास योग्य आहे असे मला वाटते.

गेल्या काही वर्षात विविध वाङ्.मयप्रकारातून विशेषतः कथा, काव्य, आत्मकथन, नाटक, कादंबरी इत्यादी वाङ्.मयप्रकारातून दलित साहित्याची निर्मिती मोठया प्रमाणावर होऊन ललित वाङ.मयाच्या कक्षा विस्तारत गेल्या आहेत. अलिकडच्या काळात दलित साहित्य हा साहित्य

निर्मितीचा आविष्कार ठरला आहे.

उदा. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक वृत्तपत्रांतून, भाषणातून आपले कितीतरी जीवनानुभव मांडलेले आहेत. त्यापूर्वी अनेक अस्पृश्य संत कवीनी आपल्या अभंगातून आपल्या व्यथा, वेदना मांडलेल्या आहेत. अर्थात हे ही खरे आहे की संतांची दु:खे ही एका विशिष्ट भक्तीभावनेतून प्रकट झालेली होती. पण तरी सुध्दा त्यातून सामाजिक दु:खे तीव्रपणे प्रकट झालेली आढळतात.

उदा. चोखामेळयाचे विटाळाचे अभंग

"यातिहीन महार । पूर्वी निळाचा अवतार ।।"

असा स्वत:चा उल्लेख चोखामेळयाने केला आहे. चोखामेळा आपला मनोभाव प्रकट करताना म्हणतो –

"बहुत हिंडलो देशदेशांतर । परि नाही मन स्थिर झाले कोठे ।।"

या अस्पृश्य संताच्या मनोव्यथा त्याच्या भक्तीभावनेतून प्रकट झाल्या. आपल्या असहाय्यतेची, अस्पृश्यतेची दु:खे चोख्याने व इतर संतांनी परमेश्वराला सांगितली. चोख्याने –

"तुझेची दारीचा कुतरा ।। नको मोकळू दातारा ।।"

ही असहायता परमेश्वरापुढे प्रकट केली होती. प्रचलित समाजव्यवस्थेमुळे भोगाव्या लागणाऱ्या व्यथा, वेदना, व दु:खे इतर कोठेही त्यांना व्यक्त करता आल्या नाहीत. चोखामेळा, बंका महार, सोयरा, निर्मळा, कर्ममेळा या सर्व अस्पृश्य संतांच्या अभंगातील आत्मपर उल्लेख आजच्या दलित कादंबरीच्या संदर्भात कालसंदर्भ म्हणून निश्चितपणे महत्वाचे आहेत. यापेक्षाही हे दलित आत्मकथनांच्या संदर्भात अधिक महत्वाचे आहेत याची प्रचिती येते.

**दलित साहित्याच्या प्रेरणा :–**

प्रामुख्याने दलित वाङ्‌मयाची प्रेरणा म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे कार्य, त्यांनी सांगितलेले तत्वज्ञान आणि त्यांची क्रांतीकारी उद्‌बोधक भाषणे ही होय. जुन्या जातीव्यवस्थेला व वर्णव्यवस्थेला विरोध करण्याची प्रेरणा ही दलित वाङ्‌मयाची प्रमुख प्रेरणा आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्य समाज अधिक प्रमाणात पिळला गेला आहे. आणि आजही सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय व मानसिक दृष्टयाही त्याचे शोषण होत आहे आणि म्हणूनच हाच समाज खऱ्या अर्थाने दलित आहे. दलित लेखक कोणाला म्हणावे व दलित कोणाला म्हणावे या विषयीचे वाद सर्वश्रुत आहेतच त्या वादात विस्तार भयास्तव जात नाही. थोडक्यात असे म्हणता येईल की दलित साहित्य म्हणजे फक्त दलितांनी लिहिलेले साहित्य नव्हे किंवा दलित असणे व त्याने लिहिणे म्हणजे दलित साहित्य नव्हे तर माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणूस हाच मोठा मानणारे, वंश, वर्ण, जातीच्या श्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य ते दलित साहित्य म्हणणे अधिक योग्य ठरते.

तात्पर्य – महात्मा गौतम बुध्द, संत कबीर, महात्मा ज्योतिराव फुले, आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महात्म्यांचे कर्तृत्व, त्यांनी दिलेले सामाजिक भान, शोषणाविरूध्द उठविलेला आवाज आणि या समाजसुधारक महात्म्यांचे तत्वज्ञान हेच प्रामुख्याने दलित साहित्य निर्मितीला पोषक ठरले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः दलितत्वाचा अनुभव घेतला, दलितांचे नेतृत्व केले व दलितत्वाचे भान देऊन इथला देव, देश आणि धर्म याविरूध्द बंड पुकारले. या बंडाद्वारे इथला दलित, शोषिक, तळागाळातला समाज अंतःर्बाह्य ढवळून निघाला. त्याला आत्मभान आले व तो त्वेषाने पेटून उठला. त्याने इथल्या देवाला, देशाला, धर्माला, वर्णाला आणि वर्गाला जाब विचारला व मानवतेचा ध्यास घेऊन माणूस बनण्यासाठी चळवळी उभारल्या. ह्या दलित चळवळीने काही अंशी दलित साहित्याला जन्म दिला आणि दलित साहित्य लिहिले गेले असे म्हणावे लागते.

सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यात वाटेगाव या गावी जन्म घेऊन तेथील परिसराच्या जन्मखुणा आपल्या व्यक्तिमत्वाज रूजवून लहानाचे मोठे झालेले शंकर भाऊ साठे हे अण्णा भाऊ साठे यांचे कनिष्ठ बंधू म्हणून दलित साहित्याच्या प्रांगणात नावारूपाला आले. समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या गावकुसाबाहेरील मांग समाजात शंकर भाऊ साठे यांचा जन्म 1925 मध्ये झाला. हलक्या जातीत जन्माला आल्याने शंकर भाऊंना वर्गाच्या बाहेर व्हरांडयात बसूनच शिक्षण घ्यावे

लागले. तत्कालीन जातीव्यवस्था बळकट असल्याने व शिक्षक उच्चवर्णिय असल्याने त्यातच घराची अत्यंत प्रतिकुल परिस्थिती या कारणांमुळे शंकरभाऊंचे फक्त पंधरा दिवसाचे शालेय शिक्षण झाले. वर्गाच्या बाहेरचे फक्त पंधरा (15) दिवसांचे शिक्षण[7] म्हणजे शंकरभाऊ एका अर्थाने निरक्षरच होते. पण या निरक्षर शंकरभाऊंनी पुढे अक्षरवाड्.मय निर्माण केले. इ.स.1980 च्या दरम्यान शंकरभाऊंनी आपल्या लेखनास सुरूवात केली. अमाप लोकप्रियता मिळण्यासारखी लेखनशैली आणि प्रतिभाशक्ती असूनही लोकप्रियतेला परान्मुख झालेले शंकरभाऊं साठे यांचे वाड्.मय, त्यांचे व्यक्तित्व या दृष्टीने आगळे–वेगळे ठरलेले आहे. या त्यांच्या आगळया–वेगळयापणाचे,
एक ललित आणि दलित लेखक म्हणून त्यांना मिळणारी श्रेष्ठता दुर्देवाने त्यांच्या हयातीत त्यांना लाभली नाही.

आशय, विषय, अभिव्यक्तीच्या आगळे–वेगळेपणाने त्यांचे ललित लेखन दलित वाड्.मयाच्या इतिहासात ठळक वैशिष्टये घेऊन वास्तवतेच्या पार्श्वभूमीवर लौकिकतेचा मानबिंदू ठरत आहे. हे आजच्या काळी सिध्द होवू लागले आहे. त्यांच्या ललित वाड्.मयाचा सुक्ष्म दृष्टीने अभ्यास करून त्यांच्या ललित वाड्.मयाचे व एका अर्थी दलित कादंबऱ्यांचे आगळे–वेगळेपण स्पष्ट करण्याचा या प्रकरणात मी प्रयत्न केलेला आहे. "सावळा" आणि "घमांडी" या कादंबऱ्यांचा वाड्.मयीन रसास्वाद घेण्याच्या अगोदर त्यांच्या एकूणच कादंबरी वाड्.मयाची ठळक वैशिष्टये या प्रकरणात मी स्पष्ट करीत आहे.

शंकर भाऊ साठे हे प्रतिभासंपन्न साहित्यिक होते. काही कवी व साहित्यिकांना जन्मताच प्रतिभेचे अलौकीक देणे लाभलेले असते. अशा भाग्यवंत साहित्यिकांपैकी शंकर भाऊ साठे हे एक प्रतिभासंपन्न साहित्यिक होत. जात्यावर बसल की आपोआप ओवी स्फुरते हे लोकसाहित्याचे वैशिष्टय शंकर भाऊंच्या ठिकाणी ठळकपणे आढळते. त्यांच्या एकूणच कादंबऱ्या त्यांच्या उस्फूर्त प्रतिभेचा स्फूल्लिंग म्हणावा लागेल. उदा. "माझा भाऊ अण्णा भाऊ" (1 ऑगस्ट 1980), हे आत्मकथनात्मक चरित्रपर पुस्तक, "एकच काडतूस" (दि.1 मे 1984), "सुगंधा"

(दि.16 मे 1991), "सूड" (दि.22 ऑक्टोबर 1985), "सगुणा" (दि.12 जून 1986), घमांडी" ( दि.12 जून 1986 ), "सावळा" ( दि.12 जून 1986 ), "हंबीरा" (दि.12 जून 1986), "जग" (दि.12 जून 1986), "लखू" (दि.12 जानेवारी 1987), "बायडी" (दि.16 मे 1991), "बाजी" (दि.16 मे 1991), "काळा ओढा" ( )

अशाप्रकारे शंकर भाऊ साठे यांनी सुमारे 12 कादंबऱ्या लिहून मराठी दलित कादंबरीच्या इतिहासात मोलाची भर घातलेली आहे. एक स्व–आत्मकथन "माझा भाऊ अण्णा भाऊ" व वर उल्लेखिलेल्या सुमारे 12 कादंबऱ्या हा त्यांचा साहित्यप्रपंच आहे म्हटले तर प्रचंड आहे. एका लेखकाने बारा कादंबऱ्या लिहिणे व या सर्व कादंबऱ्यातून त्यांनी दलित व बहुजन समाजाचे जीवन प्रचंड ताकदीने उभे करणे हे एक ठळक असे वैशिष्टये होय.

या कांदबऱ्या मनोभावे वाचल्यानंतर त्यांचे साहित्य हे लोकसाहित्याच्या हातात हात घालून चालत आहे की काय असे मला वाटते. फारसे शिक्षण न घेताही हातात लेखणी घेताच त्यांच्या प्रतिभेला वास्तवतेचे पंख फुटतात व ते आपल्या कल्पकतेच्या सामर्थ्यावर वास्तवाच्या भूमीवरील दलित जीवनाचे बंध–अनुबंध टिपतात हे त्यांच्या कादंबरी वाङ्मयाचे ठळक वैशिष्टय मला प्रकर्षाने जाणवले.

उदा. त्यांचे "सावळा", "घमांडी", "लखू", "दौलती" हे नायक आणि "सगुणा", "सुगंधा" आणि "बायडी" ही शंकरभाऊंच्या आवतीभोवती वापरणारी व काही ("दौलती", "लखू", "सावळा", "घमांडी") ही त्यांच्याच मांग समाजातील माणसे कांदबऱ्यांचे नायक म्हणून अवतीर्ण झालेली आहेत.

उदा. – त्यांच्या "सावळा" या कादंबरीतला सावळा हा शंकरभाऊंच्याच वाटेगावातल्या मांगवाडयात जन्माला आलेला (सुमारे इ.स.1910 च्या दरम्यानच्या कालखंडातला) एक दलित नायक आजच्या दृष्टीने एक मांग समाजातील अस्पृश्य, मागासवर्गिय माणूस. पण या "सावळा" ला तत्कालीन ब्रिटीश सरकारने व गावच्या बापू खोतासारख्या उच्च वर्णियांनी माणूस म्हणून त्याला

कधी आयुष्यभर जगू दिले नाही. त्याला सातत्याने नाडला—छळला व गुन्हेगार ठरविला. "सावळा" प्रमाणेच "घमांडी" या कादंबरीचा नायक जयसिंगराव यादव उर्फ घमेंडखोर "घमांडी" हा शेवगावच्या मांग समाजातला सर्वसामान्य शेतमजूर. पण शेवगावच्या जयराम चिंचणीकर या उच्चवर्णिय कारस्थानी गावगुंडाची जयसिंग उर्फ घमांडीच्या तीन एकर जमीनीवर नजर जाते व ती जमीन हडप करण्यासाठी चिंचणीकर हा घमांडीच्या वडीलांना विषप्रयोग करून ठार मारतो व खोटा स्टॅम्प बनवून जमीन बळकावतो. पुढे घमांडी या अन्यायाविरूध्द बंड करून फरारी होतो व चिंचणीकराचा एके दिवशी खुन करतो. म्हणजे सर्वसामान्य परिस्थितीत जगणाऱ्या "घमांडी" या चिंचणीकरासारख्या उच्च्वर्णियांच्या नीचप्रवृत्तीमुळे फरारी व्हावे लागते व तो खुनी म्हणून ओळखला जातो. घमांडीचे संपूर्ण कुटुंब आणि आयुष्यच उध्वस्त होते. म्हणजे घमांडीवर हा उच्चवर्णियांचा अन्याय आहे. याठिकाणी "घमांडी" हा समाजव्यवस्थेचा बळी ठरतो.

"एकच काडतूस" या कादंबरीचा "दौलती" हा नायक जातीने मांग आहे. कोल्हापूर जवळील सोनगावचा हा रहिवासी असलेला दौलती गावच्या सज्जन आणि देवमाणूस असलेल्या दादा पाटील या पोलिसपाटलाच्या घरी चाकरीला असतो. पण रामजी पाटलाकडे दादा पाटलांची पोलिसपाटीलकी जाते व कपटी रामजी पाटील दादा पाटलाला विष घालून ठार मारतो व दादा पाटलाच्या हिराबाई या पत्नीची अब्रु लुटण्याचा प्रयत्न करतो. तेंव्हा दौलती रामजी पाटलाला विरोध करतो व पुढे या दोन पाटलांच्या वैरात गावकुसाबाहेरच्या दौलती मांगाचा बळी जातो.

लेखक शंकर भाऊ साठे आणि त्यांच्या कादंबऱ्यांतील नायक "सावळा", "घमांडी", "लखू", "बाजी", "दौलती", "हंबीरा", "हैबती" या सर्व नायक आणि "बायडी", "सगुणा" आणि "सुगंधा" या नायिका इत्यादी हे सर्व नायक नायिका तत्कालीन बहुजन समाजातील असून आप—आपल्या समाजाचे प्रतिनिधित्व करताना आढळतात. शंकरभाऊ हे कल्पक होते परंतु त्यांची कल्पकता ही सत्याला घट्ट धरून होती, वास्तवाच्या सोबत होती. त्यामुळे त्यांनी आपल्या वाङ्‌मयात अद्‌भूततेला अजिबात थारा दिलेला नाही. त्यांच्या सर्वच्या सर्व कादंबऱ्यातील कथानके, घटना—प्रसंग हे सर्व सत्य असून क्वचित प्रसंगी गावाची आणि नायक—नायिका यांची नावे मात्र

A
135[illegible]6

शंकरभाऊंनी बदललेली आहेत. बाकी जे घडले, जसे घडले, ज्या गावात घडले, ज्या कारणासाठी घडले ते सर्व सडेतोडपणे कुठलाही मुलाहिजा न बाळगता शंकर भाऊ साठे यांनी आपल्या कादंबऱ्यातून मांडले आहे. बहुजनांच्या विषयी आपुलकी बाळगून आणि दलितांच्या नायक नायिका यांच्याबद्दल हृदयात अपार आस्था ठेवून शंकर भाऊ साठे यांनी कादंबरीलेखन केले असल्यामुळे त्यांची प्रत्येक कादंबरी आजच्या काळातही वाचकाच्या अंत:करणाला जाउन भिडते आणि या बहुजन समाजाने, कावकुसाबाहेरच्या दलित मांग, महार, रामोशी या समाजाने पिढयानपिढया, युगानुयुगे किती दु:ख, व्यथा, वेदना आणि सर्व बाजूंनी होणारे शोषण कसे सहन केले असेल या विचाराने वाचकांच्या हृदयाला पाझर फुटतो. वाचकाचा कंठ दाटून येतो. वाचक कादंबरीतून अंत:र्मुख होतो. म्हणजे मनोरंजनाबरोबरच वास्तवतेचे भान देणारी आणि वाचकाचे मन:परिवर्तन करून अंत:र्मुख करणारी अशा स्वरूपाची शंकर भाऊ साठे यांची लेखणी आहे. हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे एक ठळक वैशिष्टय आहे. हे येथे नमूद केल्यावाचून राहवत नाही.

उत्कटता हा साहित्याचा आत्मा असतो. शंकर भाऊंच्या कादंबरीला वाचकाच्या हृदयावर जाऊन भिडण्याची प्रचंड ताकद आहे. ही ताकद त्यांच्या व्यक्तीचित्रांनी जशी साधलेली आहे तशीच त्यांच्या कथानकांनीदेखील ती ताकद अधिक प्रबळ केलेली आहे. "सूड", "लखू", "बाजी", "हंबीरा", "जग" आणि "बायडी" या कादंबऱ्यातून आलेली कथानके त्यातील वास्तव कथावस्तुमुळेच आजच्या वाचकाला आपलेसे करतात. आजच्या मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात दलित वाङ्‌मयनिर्मितीला एक वेगळे आणि नवे प्राधान्य प्राप्त झालेले आहे. साहित्यामध्ये जग आणि जीवन, त्यांच्या व्यथा, अन्याय अत्याचार यातून जन्माला येणारी गुन्हेगारीप्रवृत्ती, व्यसनाधीनता, अंध:श्रध्दा, अज्ञान, दारिद्रय, लाचारी आणि अंधारयुगाते निकृष्ट दर्जाचे मानवी जीवन यांच्या जाणिवांचे जीवनदर्शन दलित साहित्यात पहावयास मिळते. गावकुसाबाहेरचा उपेक्षित छळाला, नाडला आणि पिडला जाणारा दलित माणूस हा दलित साहित्याने आपल्या साहित्यलेखनाचा विषय बनविला. अंधारयुगातले हे जग आणि जीवनदर्शन घडविताना साहजिकच युगानुयुगांचा, पिढयानपिढयांचा मनात दाटलेला हुंदका, आक्रोश, प्रस्थापितांविरूध्दचा विद्रोह आणि नकार, देवाधर्माविषयीची अनास्था ही दलित

साहित्याची वैशिष्टये बनली. आणि 1960 च्या दरम्यान उदयाला आलेले 'दलित साहित्य' या भूमीत चांगलेच पोसले गेले. अंगच्या कसामुळे आणि मानवतेच्या सत्वामुळे दलित साहित्य जोमाने वाढले व त्याचा पिंड हा चांगला पोसला जावून दलित साहित्य हे सर्वदृष्टीने मजबूत बनले. मार्क्सवाद, फुलेवाद आणि आंबेडकरवाद यांचे बाळकडू पिऊन दलित साहित्य मराठी भाषेच्या प्रांगणात वेदना, विद्रोह, नकार आणि उद्रेक यांना घेऊन प्रस्थापितांच्या विरोधात उभे ठाकले.

कादंबरीकार शंकर भाऊ साठे यांनी आपल्या एकूण सर्वच कादंबऱ्यातून दलितांचा हा विद्रोह प्रकट केला आहे. अन्यायाला जाब विचारून, निकराची झुंज देऊन न्याय मिळविला आहे. विषमतेला पायदळी तुडवून समानतेचा पुरस्कार केलेला आहे. शेटजी–भटजी, सावकार आणि भांडवलदार यांना शंकरभाऊंनी आपल्या लेखणीतून शह दिला आहे. महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षि छत्रपती शाहू आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या भारतीय समाजसुधारकांचे समाजपरिवर्तनाचे विचार शंकर भाऊंनी आपल्या साहित्यातून मांडून समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड पुकारले आहे. शंकर भाऊंच्या उमेदीच्या मुंबईतील जीवनात कम्युनिस्ट विचारांचा पगडा पडलेला होता. शाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमरशेख आणि शाहीर गव्हाणकर या शाहिरांच्या "लालबावटा" या 1945 साली स्थापन झालेल्या कलापथकात शंकरभाऊ 1945 पासून 1968 सालापर्यंत शाहिर म्हणून झिलकरी म्हणून काम करीत होते. 1968 पर्यंत संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांनी कलापथकाचे कार्यक्रम करून कम्युनिस्ट विचारांची पेरणी केली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लढविली. तर काही वेळ क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सोबतीने शंकरभाऊंनी स्वातंत्र्यासाठी काम केले.[8] अशा या अनुभवसिध्द शंकरभाऊंनी 1980 च्या दरम्यान आपल्या हातात लेखणी घेऊन मार्क्सवाद, फुलेवाद आणि आंबेडकरवाद यांचा सुरेख संगम आपल्या साहित्याद्वारा साधला. त्यांच्या साहित्यातून पाश्चिमात्य विचारवंत व समाजसुधारक कार्ल मार्क्स, लेनिन, मॅक्सिम गॉर्की य तत्ववेत्यांच्या विचारांचाही प्रत्यय दिसून येतो. शंकरभाऊंनी प्रचंड प्रमाणात साहित्यनिर्मिती केली. शंकरभाऊंच्या अगोदर अशी साहित्यनिर्मिती व विचारांची पेरणी अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल, शंकरराव खरात, लक्ष्मण माने, शरणकुमार लिंबाळे, डॉ.रावसाहेब कसबे, डॉ.भा.ल.भोळे,

डॉ.आ.ह.साळुंखे, नामदेव ढसाळ, दया पवार, डॉ.गंगाधर पानतावणे, केशव मेश्राम, अर्जुन डांगळे, माधव कोंडविलकर, नारायण सुर्वे या ज्येष्ठ साहित्यिकांनी केली होती व आजही करत आहेत. यशवंत मनोहर, लक्ष्मण गायकवाड, ज.वि.पवार, पार्थ पोळके, भिमराव गस्ती, प्रेमानंद गज्वी , प्रा.शशिकांत तासगांवकर, अनंत घोडे, वामनराव आवळे, डॉ.रघुनाथ केंगार, डॉ.किशोर शांताबाई काळे, बेबीताई कांबळे, प्रज्ञा लोखंडे, मल्लिका अमरशेख, यांसारखी साहित्यिक मंडळी दलितांच्या बाजूने दलित साहित्यनिर्मिती करीत आहेत.

दलित साहित्यात दलित कादंबरी प्रामुख्याने कमी प्रमाणात लिहिली गेली असल्याची टिका दलित साहित्यावर होत असतानाच व काही अंशी ते सत्यही असतानादेखील अण्णा भाऊ साठे यांच्या "फकिरा" या दलित कादंबरीने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला व अति उच्च ठिकाणी "फकिरा" या कादंबरीने स्थान मिळविले. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील मराठी भाषेत जन्माला आलेल्या या 'फकिरा' कादंबरीने रशियातील मॉस्कोपर्यंत सातासमुद्रापलिकडे रशियन भाषेपर्यंत वाटचाल कली. जर्मन, झेक, पोलिश, गुजराती,[9] हिंदी, तेलगु, मल्याळी, तामीळ, बंगाली या देशी विदेशी भाषांमध्ये "फकिरा" रूपांतरीत झाली व यानिमित्ताने दलित कादंबरी नावारूपाला आली. अण्णा भाऊंच्या या दलित कादंबरीला समाजमान्यतेबरोबरच लोकमान्यताही मिळाली. त्यांच्या "फकिरा" प्रमाणेच "गुलाम", "बरबाद्या कंजारी", "बंडखोर तात्या" ही साहित्यनिर्मिती रशियन भाषेत छापली गेली. दलित कादंबरीचा उच्चांक अण्णा भाऊ साठे यांनी गाठला. अण्णा भाऊंना लोकप्रियता मिळाली. परंतु वास्तविकपणे शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्या देखील कलात्मकतेचा आणि लोकप्रियतेचा उच्चांक गाठण्या इतक्याच सरस व पात्र अशा स्वरूपाच्या आहेत हे शंकर भाऊंच्या कादंबऱ्यांचे वेगळेपण मला येथे आवर्जुन सांगावयाचे आहे.

उदा.अण्णा भाऊंच्या "फकिरा" कादंबरीतला नायक "फकिरा" हा "सावळा" ला 'सावळानाना' म्हणून संबोधताना दिसतो. कारण 'सावळा' हा फकिराचा चुलता आहे. सावळा व फकिरा यांनी मिळूनच तत्कालीन ब्रिटीश अधिकारी 'जॉनसाहेब' व फौजदार 'बाबरखान' यांना वेळोवेळी

गुंगारा देऊन सळो की पळो करून सोडले होते. शेवटी "सावळा" व "फकिरा" नेर्ल्याच्या माळावर ब्रिटीश छावणीत जाऊन हजर होतात. याठिकाणी अण्णा भाऊंनी "फकिरा" कादंबरीचा शेवट केला आहे. तर शंकर भाऊंनी मात्र "सावळा" या कादंबरीला इथूनच सुरूवात केली आहे व फकिराच्या पश्चात सावळाने मांगजमात जगविण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतल्याचा वृत्तांत व फकिराचा उत्तरार्ध "सावळा" या कादंबरीत शंकर भाऊंनी मांडला आहे.

तात्पर्य – "सावळा", "घमांडी", "लखू", "हंबीरा", "बाजी" या कादंबऱ्या वाङ्.मयीन दृष्टया अभ्यासनिय आहेत. चिरस्मरणीय राहणाऱ्या आहेत. शंकर भाऊंच्या या कादंबऱ्यातील नायक, नायिकांना वाचक कधीच विसरू शकत नाही. हे ही शंकर भाऊंचे वेगळेपण याठिकाणी ओघानेच स्पष्ट होते. काळ बदलला, समाज बदलला परंतु शंकर भाऊंच्या कादंबऱ्यातील घटना प्रसंग, नायक–नायिका मात्र आजही प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे समाजात वेगळया रूपाने पहावयास मिळताहेत हे ही शंकर भाऊंच्या लिखाणाचे ठळक असे वैशिष्टय मानावे लागेल.

तात्पर्य – शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यांचा मूळ आत्मा म्हणजे मानवी जीवनातील वास्तवता हेच आहे. प्रेम, दु:ख, आनंद, वैर, ईर्षा या मानवी विकार–विचारांचे सत्यदर्शन शंकर भाऊंच्या कांदबऱ्यातून प्रत्ययाला येते. सातारा, सांगली आणि कोल्हापूर परिसरातील स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील (प्रामुख्याने 1910 पासून ते स्वातंत्र्योत्तर 1950) च्या कालखंडा दरम्यानच्या सत्य घटनाप्रसंगावर आधारीतच शंकर भाऊंनी आपल्या कादंबऱ्यांचा इमला उभा केला आहे. कांदबरी लिखाण करताना वास्तवासोबत कल्पकतेची सोनेरी किनार त्यांच्या साहित्याला प्राप्त झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या व कादंबऱ्यातील नायक, नायिका, उपपात्रे, घटनाप्रसंग वाचकाच्या मनावर कायमची पकड घेताना दिसतात.

शंकर भाऊंच्या कादंबऱ्यातील "लखू", "बाजी", "हंबीरा", "सावळा", "घमांडी", "दौलती", "दिनकर" हे नायक आणि "सगुणा", "सुगंधा", "बायडी" ह्या नायिका आपल्यावर होणाऱ्या अन्यायाने चिडून उठतात व बंड पुकारतात. "गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून

द्या म्हणजे तो बंड करून उठेल" या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा शंकर भाऊंच्या नायक, नायिकांच्या स्वाभावाद्वारे प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. अन्याय झाल्यावर रडत बसण्यापेक्षा लढत राहण्याची उर्मी शंकरभाऊ आपल्या नायक नायिकांच्यामध्ये बाळगतात व ही पात्रे आपोआपच बंडखोर बनतात. कधी भावनावश होतात तर कधी कर्तव्यपूर्तीसाठी आपल्या भावभावनांना आवर घालून कठोरता अंगी बाणवतात.

उदा. – "सूड" या कादंबरीची नायिका नेभापूरची "चंद्रा" आपल्या वडीलांच्या खूनाचा बदला घेते व ज्याने अन्याय केला त्याला ठार मारते. जोपर्यंत बदला घेत नाही तोपर्यंत लग्न न करण्याची तिने शपथ घेतलेली असते.

तात्पर्य-शंकरभाऊंची पात्रे ही बंडखोर तर आहेतच परंतु शरीराने पिळदार आणि हृदयाने दिलदार अशा स्वभावाबरोबरच शंकर भाऊ उभे करतात. तर सौंदर्याची कसलीच उणीव नसणाऱ्या लाखातील एक अशा देखण्या सुंदर नायिका आपल्या सौंदर्यांबरोबरच शिलाचीही जपणूक करणाऱ्या, कर्तव्यपूर्तीसाठी भावनांना आवर घालणाऱ्या, वैऱ्याला नेस्तनाभूत करणाऱ्या स्त्री नायिका शंकरभाऊ आपल्या कादंबऱ्यातून साकारतात. हे त्यांचे वेगळेपण लक्षणीय आहे. शंकरभाऊंची पात्रे संकटाला पाठ न दाखविता मरायला आणि मारायला वास्तवरूपाने सामोरी जातात हे इतर दलित, ललित कादंबरीकारांच्यापेक्षा अधिक गुणसंपन्न असे शंकरभाऊंचे वेगळेपण येथे वाचकांच्या लक्षात येते.

शंकर भाऊ साठे यांचा लेखनसाहित्याचा काळ हा स्वातंत्र्योत्तर म्हणजे साधरण 1980 नंतरचा आहे. मात्र त्यांच्या साहित्यकृतीतील घटना प्रसंग व नायक, नायिका ह्या मात्र स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आहेत. (प्रामुख्याने 1910 ते 1950) असे असून सुध्दा त्या कालखंडातील घटनाप्रसंगावर आधारित कादंबऱ्यांमधील गोडी, रंजकता आणि उत्कटता ही यत्किंचितही कमी झालेली नाही हेच त्यांच्या शैलीचे वेगळेपण म्हणावे लागेल.

शंकरभाऊंच्या कादंबऱ्यातील स्त्री–पुरूष व त्यांच्या जीवनात घडणारे घटनाप्रसंग हे सातारा, सांगली आणि कोल्हापूर परिसरातीलच असतात.

उदा. – "सावळा" ही कादंबरी सातारा, सांगली जिल्हयातील वाळवा, वाटेगांव, पेठ नेर्ले, कुरूंदवाड, शेगाव या परिसराचा समावेश असलेली आहे. 'तारापूर' गावात घडलेली "बाजी" ही कादंबरी आहे. तर "हंबीरा" ही कादंबरी "खेडगाव" या गावची आहे. "सूड" ही कादंबरी 'कमळापूर' व त्या परिसरातली आहे. "रांजणगाव", "कासेगांव", वाटेगाव या गावांचा समावेश असलेली "जग" ही कादंबरी आहे. वारणा खोऱ्यातील व वाळवा परिसरातील खुंदलापूर, मानकरवाडी, शिंदेवाडी, शिगाव, सोनगाव आणि शेवगाव या वारणा खोऱ्यातील गावचा शंकर भाऊ साठे यांच्या कादंबऱ्यात समावेश आहे. वाळवा तालुका व वारणा खोरा हा क्रांतिसिंह नाना पाटील[10] बर्डे गुरूजी, पांडू मास्तर, आत्माराम पाटील, ईश्वरबापू या क्रांतीकारक देशभक्तांची जन्मभूमी व क्रांतीचाकिल्ला आहे. याच खोऱ्यात क्रांतीवीर नागनाथ आण्णा नायकवडी, जी.डी.लाड, वसंतराव दादा पाटील, धोंडीराम माळी, रावसाहेब कळके, बाळू चौकीवाले, धन्वंतरी दादा हे देशभक्ती क्रांतीवीरहेही याच परिसरात जन्माला आले. शंकर भाऊ साठे यांनी याच परिसरात आपली कथा बीजे शोधली आणि साहित्यप्रपंच उभारला. हा परिसर स्वातंत्र्यपूर्व काळातही होता आणि आजही आहे. काळाच्या ओघात त्यात परिवर्तने घडून आलेली आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील, वैयक्तिक वैर, मत्सर, बंधुभाव, द्वेष, राजकीय संघर्ष, स्वातंत्र्याच्या चळवळी, सामाजिक आंदोलने यांचे वास्तव चित्रण शंकर भाऊंच्या कादंबऱ्यातून जसे आढळते तसेच गावकुस आणि गावकुसाबाहेरील दलित जीवन, बारा बलुतेदार, गावगाडा, भाऊबंदकी, गावकरी आणि गावगुंड, गावच्या जत्रा, कुस्त्या, तमाशा आणि सुगी या सर्वांचे वास्तव चित्रण शंकर भाऊंनी आपल्या कादंबऱ्यातून केले आहे.

वास्तव प्रकारची चित्रणे करून शंकर भाऊ आपल्या लेखन शैलीने, संवाद कौशल्याने व वर्णन कौशल्याने अशी वातावरण निर्मिती करतात की वाचकाला त्या काळात ते अचूकपणे नेऊन सोडतात. भूतकालीन जीवनाचा पट रंगविताना आपण वर्तमानकाळात असून देखील भूतकाळाशी एकरूप होवुन जातो हे आगळेवेगळे वैशिष्टय शंकर भाऊंच्या कादंबऱ्यांची ताकद वाढवितात. या

ताकदीमुळेच भावनात्मक बांधिलकी निर्माण करून त्यांच्या काही कादंबऱ्या ह्या कलात्मक उंची गाठतात.

उदा. – अण्णा भाऊंच्या "फकिरा", "चिखलातील कमळ" इ. कादंबऱ्या तर शंकर भाऊंच्या "लखू", "सूड", "जंग" इ. कादंबऱ्या.

यंत्रयुगातील व आजच्या विज्ञान युगातील जीवनाचे बदललेले संदर्भ शंकर भाऊंच्या कादंबऱ्यात आढळत नसले तरी मानवी जीवनाचे पूर्वीपासून चालत आलेले संदर्भ त्यांच्या कादंबऱ्यातून प्रकर्षाने प्रकट होतात. शंकरभाऊंच्या कादंबऱ्यातून यंत्रयुगातील औद्योगिक क्रांतीतील परिवर्तने आढळत नाहीत किंवा नव्याने प्राप्त झालेल्या मानवी जीवनाच्या सुखसुविधा त्यांच्या कादंबऱ्यातून आढळत नाहीत. आजच्या विज्ञान युगातील 21 व्या शतकाकडे चालू असलेल्या वाटचालीचे चित्र त्यांच्या कांदबऱ्यातून आढळत नाही. शंकर भाऊंनी हरितक्रांती अनुभवली, औद्योगिक क्रांती पाहिली, विज्ञानयुगही पाहिले व अनुभवले. या काळाचे युगधर्म स्वाभाविकपणेच त्यांच्या व्यक्तिमत्वाला प्राप्त झाले, तरी सुध्दा स्वातंत्र्यपूर्व काळातील जीवनमान त्यांनी स्वतः एवढया ताकदीने उभे केले. हे कसे उभे केले ? याचेच आश्चर्य वाटते. वर्तमानकाळात पाय रोवून भविष्यकाळ ज्यांनी हातात धरलेला आहे अशा या प्रतिभावंत लेखकाच्या प्रतिभेची झेप जशी गरूडझोप होती तशीच भूतकाळातही गरूडझेप "फ्लॅशबॅक" पध्दतीने भूतकाळाचा देखील वेध घेत होती. हेच मला त्यांचे एक वेगळे वैशिष्टय वाटते. लेखक या दृष्टीने त्यांची थोरवी श्रेष्ठ आहे. भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ आपल्या मुठीत घेण्याची प्रचंड ताकद यया प्रतिभावंताजवळ आहे व त्या गोष्टीचे प्रत्यंतर त्यांच्या कादंबरी वाङ्मयात येते. हेच त्यांच्या कांदबऱ्यांचे ठळक वैशिष्टय होय. हेच वैशिष्टय अण्णा भाऊंच्याही ठिकाणी होते. हे अण्णाभाऊंच्या "चिखलातील कमळ" या सारख्या कादंबरीतून प्रकर्षाने जाणवते.

शंकर भाऊंच्या कादंबऱ्या ह्या प्रामुख्याने बहुजन समाजावर आधारीत आहेत. याचा प्रत्यय आपणास त्यांच्या कादंबऱ्यातून येतो. 'वासूनाका' (भाऊ पाध्ये), 'चक्र' (जयवंत दळवी),

'माहिमची खाडी' (मधू मंगेश कर्णिक) या दलितेतरांनी दलित जीवनावर लिहिलेल्या कादंबऱ्या येथे उल्लेखनिय आहेत.

कादंबरी : व्याख्या व स्वरूप :-

कादंबरी हा एक स्वतंत्र वाड्.मयप्रकार आहे. मराठी वाड्.मयाच्या इतिहासात कादंबरी वाड्.मयाला विशिष्ठ दर्जाचे स्थान आहे. बाबा पद्मणजीच्या "यमुनापर्यटन" पासून ते हरिभाऊ आपटयांच्या "पण लक्षात कोण घेतो", "मी" मधील स्थिती" इथपर्यंतचा कालखंड हा एक विशिष्ठ कालखंड म्हणून ओळखला जातो. त्यानंतर फडके-खांडेकर यांचा कालखंड सुरू झाला तो पुढे विभावरी शिरूरकर, ग.त्र्यं.माडखोलकर, श्री.म.कुलकर्णी इथपर्यंत मराठी साहित्यातील कादंबरीचा प्रवाह अद्यापपर्यंत जोमाने वाहतोच आहे. इतर वाड्.मयप्रकारापेक्षा कादंबरी हा वाड्.मयप्रकार अधिक लोकप्रिय म्हणून ओळखला जातो. कारण "नाटक" हे पहावे लागते, ते पाहण्यासाठी दिग्दर्शक, कलाकार व प्रेक्षकांची आवश्यकता भासते. तसे कादंबरी वाचनासाठी वाचकांशिवाय इतरांची आवश्यकता भासत नाही.

"सामाजिक", "ऐतिहासिक", "राजकीय", "अद्भूतरम्य", "वास्तव", "ग्रामीण", "दलित" असे काही प्रकार कादंबरी वाड्.मयात आढळतात.

कोणत्याही वाड्.मयप्रकाराची व्याख्या करणे व त्या व्याख्येत त्या वाड्.मयप्रकाराचा सर्वांगपरिपूर्ण आढावा व आवाका सामावून घेणे हे तितके सोपे नसते. असे असले तरी ढोबळ प्रमाणात काही ठराविक व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

डॉ.मदन कुलकर्णी म्हणतात[11] - "कादंबरी म्हणजे समाज व निसर्ग याविरूध्द व्यक्तीच्या चाललेल्या संघर्षाचे महाकाव्य होय."

विल्यम लिटील म्हणतात[12] - "ज्यात जीवनाचे प्रतिनिधित्व करणारी पात्रे व त्यांचे कार्य व्यापार चित्रित केलेले असतात अशा कल्पित गद्य कथेला अथवा मर्यादीत आकाराच्या वृत्तांताला कादंबरी म्हणतात."

प्रा. श्री. मा. कुलकर्णी[13] म्हणतात – "कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्याद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललितगद्य कथा म्हणजे कादंबरी होय."

प्रा. बापट–गोडबोले[14] म्हणतात – "सत्यसृष्टीच्या आधाराने काल्पनिक प्रतिसृष्टी निर्माण करून काल्पनिक पात्रांची स्वभावचित्रे व काही अंशी तद्‌वलंबित जीवित घटना यांचे गोष्ट रूपाने वर्णन करून व कलानंदाची प्राप्ती करून जीवितातील गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणारा गद्य वाड्.मयविभाग म्हणजे कादंबरी."

कादंबरी म्हणजे काय याच्या व्याख्या आपणास वरीलप्रमाणे सांगता येतील.

मराठी साहित्यात कादंबरी हा वाड्.मयप्रकार तसा नवा व परकीय आहे. तथापी "कादंबरी" हे नाव मात्र आपलेच आहे. संस्कृत साहित्यामध्ये बाणभट्टाची[15] कपोलकल्पित कथा कादंबरी हीची नायिका – "कादंबरी" आहे. ही नायिका मराठी साहित्यात एक वाड्.मयप्रकार घेऊन अवतरली व पुढील काळात 'कादंबरी' हे विशेषनाम सामान्यनाम झाले हे त्यातील विशेष गुणामुळे. इंग्रजीमध्ये "नॉव्हेल" या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून या वाड्.मयप्रकाराच्या प्रथमावस्थेत नवलकथा हे नाव दिले गेले आणि पुढे हे नाव मागे पडले व "कादंबरी" हेच नाव रूढ झाले. हे कसे रूढ झाले ? ते कोणालाच समजले नाही. [16] 'कादंबरी' हे नाव सुमारे इ.स.1830 च्या पूर्वी पडले असावे. कारण 1829 मध्ये प्रकाशित झालेल्या महाराष्ट्र भाषेच्या कोषात हा शब्द पहावयास मिळतो. कादंबरी या शब्दाचा अर्थ "कल्पिक कथा" हा आढळतो. आणि त्याचा शाब्दिक अर्थ "कदंब" फुलापासून तयार केलेले मद्य किंवा आसव हा होय.

वरील विवेचनावरून "कादंबरी" च्या विविध व्याख्या लक्षात घेतल्यास कादंबरी ही कल्पित असते हे येथे स्पष्ट होते. मूळ वाड्.मयप्रकाराचे स्वरूप व वैशिष्टय पाहता त्यातील कल्पकतेचा भाग कादंबरी वाड्.मयात अटळ आहे हे निश्चित. आधुनिक काळात सर्वात लोकप्रिय ललित वाड्.मयप्रकार म्हणजे "कादंबरी" होय. कथा, काव्य इ. वाड्.मयप्रकारांच्यानंतर उदयाला येऊनही कादंबरी लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहचली आहे. कादंबरी वाड्.मयाचा विकास

डोळयात भरण्याइतका झाला आहे. या संदर्भात जान्हवी संत म्हणतात[17] – "मनोरंजनाचे कलात्मक अप्रतिम, सहजसाध्य व सुलभ असे साधन म्हणजे कादंबरी होय." कोणताही वाङ्मयप्रकार व्याख्येत बांधणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे अवघड कार्य आहे. विशाल अशा मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबरीचे स्वरूप अफाट व गुंतागुंतीचे असल्यामुळे तिची व्याख्या करणे अत्यंत अवघड आहे. कोणतीही व्याख्या लक्षात घेतली तरी ती परिपूर्ण नाही. फ्रेंच लेखक एम्. ऍबेल श्विहलरे ( Chevelley ) या फ्रेंच लेखकाने केलेली व्याख्या म्हणजे[18] – "जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा म्हणजे कादंबरी होय." एकंदरीत गद्यकथा म्हणजे कादंबरी हे कादंबरीचे वैशिष्ट्य येथे लक्षात घ्यावे लागते. दलित कादंबरीच्या संदर्भात हे वैशिष्ट्य लक्षात घेऊनही हे मान्य करावे लागते की आजच्या दलित कादंबरीमध्ये वास्तवतेचा आधार अधिक आहे आणि म्हणून मला असे वाटते की वास्तव जीवनदर्शन हे दलित कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य ठरते. शंकर भाऊ साठे यांची कादंबरी या नियमाशी तंतोतंत जुळते.

दलित साहित्याचे स्वरूप :–

देव, धर्म व देश यापेक्षाही "माणूस " हा अधिक मोठा आहे. म्हणूनच दलित साहित्याची व्यापकता येथे लक्षात येते. "दलित" म्हटले की आपल्या डोळयापुढे बंडखोर क्रांतीकारक हा आशय लक्षात येतो. बाबुराव बागुल[19] यांनी – "दलित म्हणजे हे जग आणि जीवन नव्याने मांडू बघणारा, दलित म्हणजे क्रांतीकारक, दलित म्हणजे बंडखोर, दलित म्हणजे लोकशाहीचा विकास करणारा" अशी व्याख्या केली आहे. तर दलित साहित्यासबंधी भालचंद्र फडके म्हणतात[20] – "दलित साहित्य हे सूडवाद्यांचे साहित्य नव्हे तर ते "माणुसकी" साठी लिहिणारांचे साहित्य आहे. आपण दलित आहोत हे निर्भयपणे स्विकारणाऱ्यांचे पण यापुढे "माणूस" म्हणून जगण्याचा हक्क प्रस्तापित करू पाहणाऱ्यांचे ते साहित्य आहे. दलित साहित्य हे या देशाच्या मातीतून उदयास आलेले साहित्य आहे." प्रा.केशव मेश्राम[21] म्हणतात – "हजारो वर्ष ज्यांच्यावर अन्याय झाला अशा अस्पृश्यांना 'दलित' म्हटले पाहिजे व त्याच वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास 'दलित साहित्य' म्हणावे."

या सर्व व्याख्यांचा विचार केला तर दलित साहित्याला सम्यक परिवर्तन अभिप्रेत आहे हे येथे स्पष्ट होते. तसेच जे साहित्य क्रांतीला सामोरे जात आहे. मग ते साहित्य ललित असो अगर दलित असो ते साहित्यच असते. हे ही येथे स्पष्ट होते. ललित साहित्य असो अगर दलित साहित्य असो एकूण सर्व साहित्याचा 'माणूस' हा केंद्रबिंदू आहे. हे येथे स्पष्ट होते व दलित साहित्य हा एक साहित्याचा भाग आहे हे लक्षात येते. दलित हा आजच्या युगाचा नायक आहे. या व्यापक दृष्टीने दलित साहित्याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

दलित साहित्याच्या संदर्भात विचार करताना एक गोष्ट निर्विवाद सत्य आहे ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत, जनक आहेत, आदर्श आहेत आणि अस्मिताही आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित चळवळीच्या माध्यमातून जो लढा निर्माण केला, त्यातून जो माणूस उदयाला आला. त्या माणसाच्या मनातून दलित साहित्याचा जन्म झाला. या व्यापक विचारातून दलित साहित्याची व्याख्या व स्वरूप, प्रेरणा विषद होतात. हिंदुंच्या चातुवर्ण्य व्यवस्थेमध्ये माणसाचा जन्म गुणकर्मावरून न ठरता जन्मवर्णावरून ठरतो. त्यामुळे उच्चनिचतेच्या कल्पना बळावत जाऊन सामाजिक विषमता उदयाला आली व त्यामुळे स्पृश्य-अस्पृश्यतेचे भेद निर्माण झाले. हिंदुच्या वेदांनीच माणसा-माणसांत भेद निर्माण केले. विसाव्या शतकात स्पृश्य-अस्पृश्यतेची जाणीव तीव्र व उत्कट होऊन क्रांती झाली व ही क्रांती दलित साहित्यनिर्मितीला कारणीभूत ठरली.

भारत हा देश सोडला इतर सर्व देशात वर्ग लढा यशस्वी होऊन सामान्य माणसाबद्दल मानवबंधुत्वाची जाणीव निर्माण झाली. पाश्चात्य देशात - "प्रोलिटेरिएट" हा श्रमजीवी वर्ग आहे. या समाजवादी देशाने विज्ञानदृष्टी ठेवली व तिच त्यांच्या जीवनाची प्रेरणा ठरली. भारतामध्ये "प्रोलिटैरिएट" तसेच "सोशलप्रोलिटेरिएट" म्हणजे "दलित" आहेत. त्यांच्यामध्ये जातीभेद निर्माण होऊन स्पृश्य-अस्पृश्य असा भेद निर्माण झाला व हे दोन्ही श्रमजीवी वर्ग आपआपसात लढत राहिले. त्यामुळे आपल्या देशात सामाजिक विषमता वाढीस लागली. यामुळे अस्पृश्यता, दारिद्र्य,

अज्ञान, लाचारी, गुलामगिरी, या प्रवृत्ती आपल्या देशात वाढत गेल्या. याबरोबरच साम्राज्यशाही, भांडवलशाही, देवधर्माचा आधार घेऊन अत्याचार करण्याची प्रवृत्ती वाढत गेली व आजही ती वाढत आहे. आमच्या देशात अंध:श्रध्दा, रूढी, परंपरा, शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, चमत्कार, गुरू, नेते यांच्या अधिन होण्याची प्रवृत्ती वाढत जाऊन मानसिक दास्यत्व बळकट होत गेले. सुशिक्षित लोकांच्या संदर्भातही ही मानसिक दास्यत्वाची प्रवृत्ती वाढत गेली. हे मानसिक दौर्बल्य व दास्यत्व सामाजिकदृष्टया अत्यंत वाईट गोष्ट आहे. त्यासाठी बौध्दिक, वैचारिक क्रांतिची आवश्यकता आहे. मनाची क्रांती झाल्याशिवाय समाजात क्रांती होत नाही हेच खरे ही गोष्ट महात्मा फुले यांनी व त्यांच्यासारख्या द्रष्टया विचारवंतांनी जाणली होती. या विचारवंतांनी व कर्त्या समाजसुधारकांनी वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, आणि स्त्रीदास्य नष्ट करण्यासाठी जे धैर्य दाखविले त्याला भारताच्या सामाजिक इतिहासात तोड नाही. सत्यशोधक समाजाची स्थापना करून महात्मा ज्योतिराव फुले यांनी उच्चवर्णियांच्या जन्मनिष्ठ उच्च-नीचतेवर हल्ला केला. जातीव्यवस्थेविरूध्द त्यांनी उभारलेले बंड तत्कालीन सामाजिक विषमतेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे बंड होय. अगोदरच राजकीय पारतंत्र्य त्यातच जातिनिष्ठ उच्च-निचतेचा प्रभाव यामुळे भारतीय समाजाची मानसिक कुचंबणा झाली. पारतंत्र्यामुळे प्रजेची मने मरून जातात. त्याप्रमाणेच जन्मसिध्द उच्चनिचतेच्या कल्पनेमुळे जातीची मने कुस्करून जातात. दलित समाजाच्या संदर्भात हेच घडले. देवता या ब्राह्मणांच्या व राजपुरूषांच्याठायी असतात असा शास्त्रसिध्दांत मांडून युगानुयुगे दलितांची पिळवणूक झाली. महात्मा फुले यांनी या उपेक्षेला पहिल्यांदा तोंड फोडले व स्वतः प्रत्यक्ष कृती करून बहुजन समाजामध्ये बौध्दिक व वैचारिक जागृती घडवून आणली. महात्मा फुले यांनी जातियतेविरूध्द उभारलेल्या बंडामुळे पुढच्या अनेक पिढयांच्या कर्त्या पुरूषांना स्फुर्ती मिळाली. बहुजन समाजाच्या उपेक्षेचे आर्त आक्रंदन प्रथम ऐकणारा आणि परंपरेच्या शृंखला तोडून बहुजन समाजाला आत्मोध्दाराचा मार्ग दाखविणारा खरा "महात्मा" ज्योतिराव फुले हेच होत. खऱ्या अर्थाने त्यांनी सत्यधर्म शिकविला. समाजातील जातीय विषमतेच्या यातना दूर करून लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी ज्या महापुरूषांनी आपल्या कर्तृत्वाचे योगदान दिले. त्यामध्ये महात्मा गौतम बुध्द, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षि छत्रपति शाहुमहाराज, डॉ. बाबसाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, लेनिन, मॅक्झिम गॉर्की

यांचा येथे आवर्जुन उल्लेख करणे आवश्यक आहे. या सर्व महापुरूषांनी "माणूस" हा देवधर्म आणि देश यापेक्षाही मोठा असतो असा संदेश सर्व जगाला दिला व सर्व जगात त्यांनी बौध्दिक व वैचारिक जागृती घडवून आणली. या वैचारिक परिवर्तनाच्या उत्कट व तीव्र पार्श्वभूमीवरच दलित साहित्याचा जन्म झाला आहे.

अशाप्रकारे दलित साहित्याचे स्वरूप व वैशिष्टये लक्षात घेऊन शंकर भाऊ साठे यांच्या "सावळा" व "घमांडी" या कादंबऱ्यांचा सामाजिक व वाङ्मयीन दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा माझ्या पुढील चौथ्या प्रकरणात मी प्रयत्न केला आहे. तोच माझ्या लघु–शोध–प्रबंधाचा प्रमुख विषय आहे.

## संदर्भ सूची

1. डॉ.एस्.एस्.भोसले, "नागरी परंपरेचा लोकविकास", सुरेश एजन्सीज, पुणे, प्रथमावृत्ती, जुलै – 1987, पृष्ठ क्रं.139.

3. भालचंद्र फडके, "दलित साहित्य : वेदना व विद्रोह", श्रीविद्या प्रकाशन – 250 – पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर 1977, पृष्ठ क्रं.208.

3. तत्रैव, पृष्ठ क्रं.209.

4. अण्णा भाऊ साठे, "फकिरा", सुरेश एजन्सीज, पुणे, अठरावी आवृत्ती, एप्रिल – 1998, "कैफियत".

5. शंकर भाऊ साठे, "सूड", विद्यार्थी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, दि.22 ऑक्टोबर 1985, प्रास्ताविक.

6. शंकर भाऊ साठे, "लखू", विद्यार्थी प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, दि.14 जानेवारी 1987, "थोडक्यात दोन शब्द".

7. शंकर भाऊ साठे, "माझा भाऊ अण्णा भाऊ", विद्यार्थी प्रकाशन, पुणे – 9, तिसरी आवृत्ती – एप्रिल 1990, "आत्मकथन".

8. शंकर भाऊ साठे, "सूड", विद्यार्थी प्रकाशन, पुणे – 2, प्रथमावृत्ती, दि.22 ऑक्टोबर 1985, प्रास्ताविक.

9. शंकर भाऊ साठे, "माझा भाऊ अण्णा भाऊ", विद्यार्थी प्रकाशन, पुणे 9, तिसरी आवृत्ती, एप्रिल 1990, "आत्मकथन".

10. डॉ.बाबुराव गुरव, "अण्णा भाऊ साठे बालजीवनमाला", लोकवाङ्मय गृह लि. प्रभादेवी, मुंबई, पृष्ठ क्रं.14.

11. डॉ.मदन कुलकर्णी, "मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप", श्री मंगेश प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती, दि.13 जून 1984, पृष्ठ क्रं.1.

12. तत्रैव, पृष्ठ क्रं.5.

13. तत्रैव, पृष्ठ क्रं.5.

14. प्रा.बापट–गोडबोले, "मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास", व्हिनस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, सप्टेंबर 1973, पृष्ठ क्र.37.

15. प्रा.जान्हवी संत, "कादंबरी : एक वाङ्‌मयप्रकार", मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती – नोव्हेंबर 1971, पृष्ठ क्रं.7.

16. तत्रेव, पृष्ठ क्रं.7.

17. तत्रैव, पृष्ठ क्रं.8

18. तत्रैव, पृष्ठ क्रं.9

19. बाबुराव बागुल, "दलित साहित्य : आजचे क्रांतीविज्ञान", बुध्दिस्ट पब्लिशिंग हाऊस, नागपूर – 9, प्रथमावृत्ती, दि.15 ऑगस्ट 1981, पृष्ठ क्र. ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील शेवटचे पान.

20. भालचंद्र फडके, "दलित साहित्य : वेदना व विद्रोह", श्रीविद्या प्रकाशन, 250 शनिवार पेठ, पुणे 30, पृष्ठ क्रं.10.

21. तत्रैव, पृष्ठ क्रं.28.